# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:29.08.2024** **वारःगुरुवार**

---

1. बारा नव्या हरितक्षेत्र औद्योगिक स्मार्ट सिटी प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी, 730 एफएम प्रसारण वाहिन्यांच्या लिलावाचा निर्णय,
2. प्रधानमंत्री जनधन योजनेची दहा वर्षे,
3. खरीप पिकांच्या पेरणी क्षेत्रात यंदा लक्षणीय वाढ,
4. 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन आणि कार्याचं एकविसाव्या शतकातील महत्त्व आणि समयोचितता' या विषयावर पुणे विद्यापीठात उद्यापासून राष्ट्रीय परिषद आणि
5. पॅरीस पॅराऑलिम्पिक स्पर्धांना आरंभ

**<u>कॉरीडॉर</u>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमाअंतर्गत बारा नवीन हरितक्षेत्र औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी दिली आहे. या औद्योगिक क्षेत्रात एकत्रित 28 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे, आणि दहा लाख प्रत्यक्ष आणि 30 लाख अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्ली इथं मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर बातमीदारांना दिली. हे बारा प्रकल्प दहा राज्यांमध्ये पसरलेले असून महाराष्ट्रातील दिघी कॉरिडॉरचा त्यात समावेश आहे.

**<u>वाहिन्या</u>**

देशातल्या 234 शहरांमध्ये 730 एफएम प्रसारण वाहिन्यांच्या लिलावाला केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. यात महाराष्ट्रातल्या 11 शहरांचा समावेश आहे. आकांक्षित जिल्हे आणि नक्षल प्रभावित भागाला या प्रसारणासाठी प्राधान्य देण्यात आलं आहे असं वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>जनधन</u>**

प्रधानमंत्री जनधन योजनेला काल 'एक दशक' पूर्ण झालं. या योजनेअंतर्गत देशभरात आतापर्यंत 53 कोटी जनधन खाती उघडण्यात आली आहेत. योजनेच्या दशकपूर्तीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाभार्थींचं अभिनंदन केलं असून ही योजना यशस्वी केल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. आर्थिक समावेशन आणि महिला-युवकांच्या सक्षमीकरणाच्या प्रयत्नांमध्ये जनधन योजनेचा महत्त्वाचा वाटा असल्याचं मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. हा जगातला सर्वात मोठा 'वित्तीय समावेशन उपक्रम' असून अर्थ मंत्रालय, या माध्यमातून उपेक्षित आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना आधार देण्याचा प्रयत्न सातत्यानं करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं.

**<u>खरीप पेरण्या</u>**

देशात खरीप पिकांच्या पेरण्यांचं प्रमाण यंदा वाढलं आहे, लागवडीखालचं एकंदर क्षेत्र एक हजार 65 लाख हेक्टरपेक्षा जास्त असून तुलनेनं गेल्या वर्षी याच कालावधीत अंदाजे एक हजार 44 लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागानं आत्तापर्यंतच्या खरीप पिकांच्या पेरणीचा अहवाल काल प्रकाशित केला. या अहवालानुसार भाताचं

पेरणी क्षेत्र 394 लाख 28 हजार हेक्टरवर पोहोचलं असून गेल्या वर्षीच्या याच कालावधीत हे क्षेत्र 378 लाख 4 हजार हेक्टर होतं. कडधान्य 122 लाख 16 हजार हेक्टर झालं आहे. भरडधान्य 185 लाख 51 हजार हेक्टरवर अशी वाढीव पेरणी झाली आहे. तसंच तेलबियांच्या क्षेत्रातही वाढ झाली असून 188 लाख 37 हजार हेक्टरवर तेलबियांची पेरणी झाली आहे.

**शिव-परिषद**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन आणि कार्याचं एकविसाव्या शतकातील महत्त्व आणि समयोचितता' या विषयावर उद्यापासून दोन दिवस राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. एक वृत्तांत...

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवानिमित्त आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला 350 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्तानं या आंतरविद्याशाखीय आणि बहुभाषिक राष्ट्रीय परिषदेचं आयोजन केलं आहे. राष्ट्रीय परिषदेसाठी देशभरातून आणि राज्यातून 75 शोधनिबंधांची नोंदणी झाली असून, त्यांच्या सादरीकरणासाठी नऊ समांतर सत्रं होणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची अष्टक्रांती, राज्यनीती, शिवकालीन कागदपत्रांच्या अभ्यासाची पद्धत या विषयांवर तज्ञांची व्याख्यानं होणार आहेत. अमृतमहोत्सवानिमित्त विशेष टपालतिकिटाचंही प्रकाशन केलं जाणार आहे. विद्यापीठाचा संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभाग, तत्त्वज्ञान विभाग आणि बहिःशाल शिक्षण मंडळ, भारत इतिहास संशोधक मंडळ, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ आणि डेक्कन महाविद्यालय अभिमत विद्यापीठ यांनी परिषदेतील विविध सत्रं आणि विशेष व्याख्यानांचं नियोजन केलं आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी विजयालक्ष्मी साळवी, पुणे.**

**पुतळा**

मालवण तालुक्यातील राजकोट इथला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्यामागची कारणं शोधणं आणि एकंदरच या दुर्दैवी घटनेसंदर्भात विस्तृत कारणमीमांसा करण्यासाठी स्थापत्य अभियंते, तज्ञ, आयआयटी तसंच नौदलाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक तांत्रिक संयुक्त समिती नेमण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. ही समिती जबाबदारी निश्चित करेल. छत्रपती शिवाजी महाराजांचा त्यांच्या कर्तुत्वाला साजेसा भव्य आणि अत्युत्कृष्ट पुतळा उभारण्याच्या दृष्टीनं देशातील उत्तम शिल्पकार, स्थापत्य अभियंते, तज्ञ, नौदलाचे अधिकारी यांची एक समितीही नेमण्याचे निर्देश त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले.

**ऑलिम्पियाड-मुंबई**

सतराव्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या चमूनं 1 सुवर्ण आणि 4 रौप्यपदकांना गवसणी घातली आहे. 17 ते 26 ऑगस्टदरम्यान ब्राझिलची राजधानी रिओ दी जानेरो इथं झालेल्या या स्पर्धेत बंगळुरूचा दक्ष तयालिया यानं सुवर्ण, तर पुण्याचे आयुष कुठारी आणि सानिध्य सराफ, हैदराबादचा बानीब्रत माजी आणि बिहारचा पाणिनी या चौघांनी रौप्यपदकाची कमाई केली. पदकतालिकेत भारत आठव्या स्थानी राहिला. इंदोरच्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे प्राध्यापक भार्गव वैद्य आणि मुंबईच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, टाटा मूलभूत संशोधन संस्थेचे प्रितेश रणदिवे यांनी या चमूचं नेतृत्व केलं. पुढची खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धा मुंबईत होणार आहे.

**राज्यपाल**

समाजाच्या सर्व स्तरातील घटकांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून विकासाचं पथदर्शी प्रारूप उभारण्यासाठी 'आदिवासी विद्यापीठ' स्थापण्याकरिता लवकरच पावलं उचलली जातील, असं राज्यपाल आणि कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज पुण्यात सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभात बोलताना सांगितलं. यावेळी राज्यपालांच्या हस्ते विद्यापीठातील 246 पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदक आणि प्रमाणपत्रांचं वाटप करण्यात आलं. तांत्रिक प्रगती, शैक्षणिक, संशोधन आणि विशेषत: महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात सीओईपीनं मोठी प्रगती केली आहे. सीओईपी सारख्या संस्थांद्वारेच आपण एक स्वावलंबी भारत घडवू शकतो असा विश्वास राज्यपालांनी व्यक्त केला.

**रानभाजी महोत्सव-धाराशिव**

धाराशिव जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव कृषि विभाग आणि आत्माच्या वतीनं काल आयोजित करण्यात आला होता. जिल्ह्यातील महिला शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी करटुले, हादगा, चिघळ, तांदुळजा, लसूणपात, कुरडू, पाथरी, कढीपत्ता, आघाडा, अंबाडी, बांबू, केना, आळूचे पान, उंबर, पिंपळ, शेवगा, कपाळपुटी, गुळवेल, कोरफड, फांजी, वासनवेल, काटेमाठ, सराटा, ओवापान, कवठ यासह 80 हून अधिक रानभाज्या आणि रानफळं विक्रीसाठी आणली होती.

**अनावरण-मुंबई**

म्हाडाच्या मुंबई मंडळ सोडतीतल्या 370 सदनिकांच्या विक्री किंमतीत 10 ते 25 टक्क्यांपर्यंत कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचं गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी काल सांगितलं. वांद्रे इथं 'म्हाडा शुभंकर चिन्हाचं' अनावरण करताना सावे बोलत होते.

**एनसीसी**

राष्ट्रीय छात्र सेनेचं अखिल भारतीय नौसैनिक शिबीर लोणावळा इथल्या आयएनएस शिवाजी या संस्थेत 26 ऑगस्ट ते 5 सप्टेंबरपर्यंत सुरु आहे. देशभरातील सहाशेहून अधिक छात्र यात सहभागी झाले असून शारीरिक तसंच मानसिक आव्हानात्मक अनेक उपक्रम, स्पर्धा, व्यायाम आणि नेतृत्व कार्यशाळांमध्ये ते भाग घेतील. छात्रांना आयएनएस शिवाजी इथल्या समुद्री अभियांत्रिकी प्रशिक्षण सुविधा देखील पाहता येणार आहेत.

**पॅरालिंपिक**

दिव्यांगांसाठीच्या पॅरालिंपिक स्पर्धेला कालपासून पॅरीस इथं सुरुवात झाली. 2020 मध्ये झालेल्या टोकिओ ऑलिंपिकचा सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू सुमित अंतिल आणि ॲथलीट भाग्यश्री जाधव उद्घाटन सोहळ्यात भारताचे ध्वजवाहक होते. या स्पर्धा येत्या 8 सप्टेंबरपर्यंत चालणार आहेत. 22 क्रीडाप्रकारांचा स्पर्धेत समावेश असून त्यातल्या 12 खेळांमध्ये भारताचा 84 जणांचा आतापर्यंतचा सर्वात मोठा पॅरालिंपिक संघ सहभागी होत आहे. पॅरा सायकलिंग, पॅरा ज्युडो आणि पॅरा रोइंग या प्रकारांत प्रथमच भारतीय क्रीडापटू आपलं कौशल्य अजमावणार आहेत.

**पाऊस**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण इथल्या जायकवाडी धरणाची पाणीपातळी साडे 64 टक्क्यांवर पोहोचली आहे. धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरु आहे. धाराशिव जिल्ह्यातलं तेरणा धरण पूर्ण भरलं आहे. यामुळे परिसरातल्या विहिरी आणि कूपनलिकेच्या पाणी पातळीत वाढ होऊन शेतकऱ्यांना बागायती शेती करण्यास मदत होणार आहे. गुजरातमध्ये मुसळधार पाऊस सुरू असून, जनजीवन विस्कळीत झालं आहे. वडोदरा भागात होत असलेल्या पावसामुळे पश्चिम रेल्वेच्या मुंबईहून गुजरातकडे जाणाऱ्या अनेक एक्सप्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.